मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543

युवाशक्ती मिडिया, प्रेस अँड फिल्म वर्कर्स युनियन (रजि.) YUVASHAKTI MEDIA,PRESS AND FILM WORKERS UNION

वर्ष ७वे | अंक :४६ | रविवार दि.१५ फेब्रुवारी ते शनिवार २१ फेब्रुवारी २०२६ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय Urban Cooperative Bank: संचालकांबाबतची संदिग्धता

पान ३ नवऱ्याने बायकोला मान द्यायलाच पाहिजे...

पान ४ महापौरांकडून विभागांचा जाब...

## मार्च २०१७ ते २०२५ दरम्यान वसई–विरार घनकचरा व्यवस्थापनात कामगार शोषणाचे गंभीर आरोप - ठेकेदार हजर, कामगार उपआयुक्तांची ठोस कारवाई

वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन ठेक्यांत मार्च २०१७ ते २०२५ या कालावधीत कार्यरत असलेल्या कामगारांना PF, ESIC, Gratuity, PT, MLWF न देणे, बनावट हजेरी मस्टर, बोनस व रजा वेतनात फसवणूक, फेक बायोमेट्रिक अटेंडन्स तसेच फिटनेस, विमा व PUC नसलेली वाहने जबरदस्तीने चालवण्यास भाग पाडणे या गंभीर आरोपांवर आज १०/०२/२०२६ रोजी पालघर येथे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात सुनावणी पार पडली.सदर प्रकरणात मार्च २०१७ ते २०२५ या कालावधीत कामगारांच्या वैधानिक हक्कांचे उल्लंघन केल्याचे RTI उत्तरातून स्पष्ट झालेल्या व गंभीर स्वरूपाचे आरोप असलेल्या



ठेकेदारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :Anant Enterprises, Sai Ganesh Enterprises, Dinesh B. Sankhe, Ujala Labour Contractor, Renbo Enterprises, R.B. Infratech, Reliable Agencies, Shivam Enterprises, Mandip Enterprises ke Hena Enterprises.या सुनावणीस वरील सर्व ठेकेदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र, वसई–विरार शहर महानगरपालिकेकडील अपेक्षित सहाय्यक जनमाहिती अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहिले नाहीत; त्यांच्या ऐवजी केवळ लिपिक उपस्थित होते. कामगारांच्या बाजूने ठाम भूमिका मांडण्यासाठी युवाशक्ती कामगार संघटनेच्या अध्यक्षा रुबिना मुल्ला स्वतः सुनावणीस उपस्थित होत्या. सुनावणीदरम्यान मांडलेल्या मुद्द्यांची सहाय्यक कामगार आयुक्तांनी गंभीर दखल घेत ठेकेदारांना सर्व संबंधित कागदपत्रे सादर करण्यासाठी २५ दिवसांची मुदत दिली असून, पुढील सुनावणी ११/०३/२०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.या संदर्भात रुबिना मुल्ला म्हणाल्या, 'कामगारांच्या हक्कांसाठीचा हा लढा पहिल्या टप्प्यात यशस्वी ठरला आहे. सहाय्यक कामगार आयुक्तांच्या पान नं.२वर

## वसईतील Universal College of Engineerin विरोधात कामगार तक्रार; कामगार उपआयुक्तांकडून सुनावणी

वसई पूर्व : प्रतिनिधी वसई पूर्व येथील Universal College of Engineerin संदर्भात किमान वेतन न देणे, बेकायदेशीररीत्या कामावरून दूर ठेवणे तसेच विविध कामगार कायद्यांचे उल्लंघन झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी पालघर येथील कामगार उपआयुक्त कार्यालयाने दखल घेत संबंधित पक्षांना सुनावणीसाठी पाचारण केले आहे. युवाशक्ती कामगार संघटनेच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, संबंधित कामगारांना किमान वेतन, ईएसआय, ग्रॅच्युइटी आदी कायदेशीर हक्कांपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात




आला आहे. तसेच काही कामगारांना कामावरून दूर ठेवण्यात आल्याची बाबही तक्रारीत नमूद करण्यात आली आहे. सदर तक्रारीच्या पार्श्वभूमीवर कामगार उपआयुक्त कार्यालयाने अधिकृत बैठक बोलावली असून, दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून पुढील निणय घेतला जाणार आहे. प्रशासनाकडून न्याय्य तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, युवाशक्ती कामगार संघटनेने स्पष्ट केले की, कामगारांना तात्काळ कामावर रुजू करून त्यांच्या प्रलंबित वेतनासह सर्व कायदेशीर हक्कांची पूर्तता करावी. अन्यथा कायद्याच्या चौकटीत राहून शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. पान नं.२वर

## वसई-विरार शहर महानगरपालिकातील घनकचरा विभागावरील तक्रारीकडे नवनिर्वाचित महापौरांचे लक्ष?

विरार : प्रतिनिधी -वसई–विरार शहर महानगरपालिकाच्या घनकचरा व्यवस्थापन (आरोग्य) विभागातील कथित अनियमितता, मनमानी कार्यपद्धती आणि अपुऱ्या मनुष्यबळ वाटपाबाबत गंभीर तक्रार समोर आली आहे. 'युवाशक्ती एक्सप्रेस'च्या कार्यकारी संपादिका रुबिना मुल्ला यांनी महापौर व आयुक्तांसह राज्य व केंद्रातील विविध संवैधानिक पदाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. नवनिर्वाचित महापौर या प्रकरणाची दखल घेणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. तक्रारीनुसार, महानगरपालिकेत एकूण ९ प्रभाग असताना प्रत्यक्षात केवळ ५ आरोग्य निरीक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे प्रत्येक निरीक्षकावर दोन प्रभागांचा अतिरिक्त भार टाकण्यात आला असून, परिणामी देखरेख व अंमलबजावणीवर परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वसई पाचूबंदर परिसरातील आगप्रकरणासारख्या घटनांकडे याच पार्श्वभूमीवर पाहिले जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच, २००६ पासून वैध 'सॅनेटरी इन्स्पेक्टर' प्रमाणपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांना संधी न देणे, तर काही ठिकाणी आवश्यक पात्रता नसतानाही जबाबदाऱ्या देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. पात्र कर्मचाऱ्यांना इतर विभागांत ठेवून घनकचरा विभागात अपात्रांची नियुक्ती केल्याने प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.विभागात काही अधिकाऱ्यांची मक्तेदारी चालत असल्याचा तसेच ठेकेदारांमार्फत आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारींचा उल्लेखही करण्यात आला आहे. या संदर्भात स्वतंत्र चौकशीची मागणी करण्यात आली असून, प्रकरण भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या चौकटीत तपासण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. प्रमुख मागण्या- सर्व आरोग्य निरीक्षक व सॅनेटरी इन्स्पेक्टर यांच्या पात्रता व नियुक्ती प्रक्रियेची सखोल चौकशा एक निरीक्षक – एक प्रभाग' ही कार्यपद्धती तात्काळ लागू करणेदीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत अधिकाऱ्यांची रोटेशन पद्धतीने बदली२००६ पासून पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना न्याय्य संधी संभाव्य आर्थिक गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी दरम्यान, तक्रारीची प्रत राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, National Commission for Scheduled Castes, Maharashtra State Commission for SC & ST तसेच राज्य शासनातील संबंधित विभागांकडे पाठविण्यात आल्याचे समजते.महानगरपालिकेकडून या तक्रारीबाबत अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसली, तरी सार्वजनिक आरोग्य व नागरिकांच्या सुरक्षेशी निगडित मुद्द्यांमुळे या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवनिर्वाचित महापौर व आयुक्त या तक्रारीवर काय भूमिका घेतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय...!

## Urban Cooperative Bank: संचालकांबाबतची संदिग्धता

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे.कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल□यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? 'पूर्ण वेळ संचालक' ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते.संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु 'सलग' या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत 'सलग' शब्दाऐवजी 'एकूण' असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली!केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती.१) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती.बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा........

## वसईतील Universal College of Engineerin ...पान नं.१

या प्रकरणाकडे कामगार व शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले असून, सुनावणीनंतर नेमका काय निणाय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मार्च २०१७ ते २०२५ दरम्यान वसई–विरार घनकचरा... पान नं.१

संदर्भानुसार, पुढील टप्प्यात गरज भासल्यास कामगार आयुक्तांच्या संदर्भासह थेट लेबर कोर्टात जाण्याचा मार्गही खुला आहे.'

## नालासोपारा : महामार्गालगतची बेकायदा बांधकामे जमीनदोस्त



वसई : प्रतिनिधी मुंबई-अहमदाबाद महामार्गलगत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर शुक्रवारी कारवाईचा बडगा उगारण्यात आला. वसई वाहतूक पोलीस विभाग आणि वसई–विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त पथकाने वर्सीवा ब्रिज ते तुंगार फाटा या दरम्यान सव्हिस रोडवरील अतिक्रमणे हटवली.कारवाईदरम्यान टपऱ्या, हॉटेलसमोरील पत्रा-बांबू शेड, टायर पंक्चर दुकाने तसेच अनधिकृत गॅरेज यांवर हातोडा चालविण्यात आला. या संदर्भात वाहतूक विभागाने मनपाशी पूर्वीच पत्रव्यवहार करून संयुक्त कारवाईची मागणी केली होती. सव्हिस रोडवरील अतिक्रमणावर कारवाई वसई फाटा, नालासोपारा फाटा, तुंगारेश्वर परिसरातील सव्हिस रोडवर काही गॅरेज व व्यावसायिकांनी बेकायदेशीररीत्या जागा व्यापल्याचे निदर्शनास आले होते. परिणामी वाहतूक कोंडी वाढत होती आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

महत्त्वाच्या रस्त्यालगत अतिक्रमण करून उभी करण्यात आलेली वाहने अपघाताला आमंत्रण देत असल्याच्या तक्रारी होत्या. काही ठिकाणी स्थानिकांना पायी चालताना किंवा वाहन काढताना अडचणी निर्माण होत होत्या. कारवाई पुढेही सुरू राहणार'महामार्गावरील अनधिकृत टपऱ्या, शेड आणि दुकाने यामुळे वाहतुकीवर परिणाम होत होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून ही संयुक्त कारवाई करण्यात आली असून पुढेही अशी मोहीम सुरू राहील,' अशी माहिती वसई वाहतूक विभागाचे निरीक्षक प्रशांत लांगी यांनी दिली. दरम्यान, प्रशासनाच्या या कारवाईमुळे सव्हिस रोड मोकळा झाल्याने वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. आगामी काळात महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर सातत्याने लक्ष ठेवण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे

## समिती अध्यक्षांची होणार निवड;२० फेब्रुवारीला पहिली महासभा

नालासोपारा : वसई-विरार शहर महानगरपालिकामध्ये महापौर व उपमहापौर निवडीनंतर आता विविध समित्यांच्या अध्यक्षपदांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापौर व उपमहापौरांची निवड ३**फेब्रुवारी** रोजी पार पडली असून, आता पहिल्या महासभेत स्थायी समितीसह इतर विषय समित्यांची रचना होणार आहे.पालिकेकडून २०**फेब्रुवारी** रोजी दुपारी ३ वाजता पहिली महासभा बोलावण्यात आली आहे. या सभेत १६ सदस्यांची स्थायी समिती निवडण्यात येणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महासभेतूनच स्थायी समिती सदस्यांची निवड केली जाते. त्यानंतर स्थायी समिती सभापतीची निवड प्रक्रियेनुसार होणार आहे.यासोबतच सभागृह नेता, विरोधी पक्षनेता तसेच विविध विषय समित्यांच्या सभापतीपदांसाठीही हालचालींना वेग आला आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतर्फे अंतर्गत बैठका सुरू असून, इच्छुकांकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.स्थायी समिती ही पालिकेच्या आर्थिक व प्रशासकीय निणायप्रक्रियेतील महत्त्वाची समिती मानली जाते. वार्षिक अंदाजपत्रक, खर्च मंजुरी आणि धोरणात्मक निणायांमध्ये या समितीची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे सभापतीपदासाठी विशेष चुरस अपेक्षित आहे.महासभेतील घडामोडींवरून आगामी काळातील राजकीय समीकरणे स्पष्ट होणार असल्याने सर्वांचे लक्ष २० **फेब्रुवारी** कडे लागले आहे.

## हरित नव्हे, प्रदूषित शहर! डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याचे ढीग; दुर्गंधी व धुरामुळे आरोग्य धोक्यात

नालासोपारा : वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येसोबत शहरातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाणही वाढत आहे. मात्र कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट न लागल्याने गोखिवरे तसेच आगाशी-बोलिंज रोड परिसरातील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याचे ढीग साचत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून होत आहे. परिणामी दुर्गंधी व धुरामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता खालावत असून नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.गोखिवरे येथील डम्पिंग ग्राउंड अनेक वर्षांपासून वादाच्या केंद्रस्थानी आहे. मधुबन टाउनशिप, एव्हरशाइन सिटी, वालीव, भोईदापाडा आदी दाट लोकवस्तीच्या भागांतील रहिवाशांनी वारंवार दुर्गंधी व धुराबाबत तक्रारी केल्या आहेत. साठवलेल्या कचऱ्यावर पुरेशी प्रक्रिया होत नसल्याचा आरोप होत असून, काहीवेळा कचऱ्याला लागणाऱ्या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरतात, अशीही माहिती स्थानिकांनी दिली.दरम्यान, पर्यावरण अभ्यासक चरण भट्ट यांनी गोखिवरे व बोलिंज डम्पिंग ग्राउंडमुळे होणाऱ्या प्रदूषणाविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यापूर्वीच्या सुनावणीत न्यायालयाने पालिकेवर



१८४ कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याचे सांगितले जाते. संबंधित प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याची माहिती उपलब्ध आहे.भट्ट यांच्या पाठपुराव्यानंतर कचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी निधी मंजूर झाला असून दोन प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची कामे सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात कचऱ्याचे उघड्यावर साठवण व जाळण्याच्या घटना सुरूच असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.आगाशी-बोलिंज रोडवरील डम्पिंग ग्राउंडचीही स्थिती चिंताजनक असल्याचे समोर येत आहे. बोलिंज, आगाशी, वटार व कोफराड परिसरात वायुप्रदूषण वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. निवासी भागाच्या जवळ कचरा जाळला जात असल्यास ते आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते, अशी भूमिका पर्यावरण कार्यकर्त्यांनी मांडली आहे.यासंदर्भात महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी प्रतिक्रिया देताना, 'मी सध्या रजेवर आहे. चरण भट्ट यांनी न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहिती आहे. सोमवारी रुजू झाल्यानंतर प्रकरणाचा तपशील पाहू,' असे सांगितले.घनकचरा व्यवस्थापनाबाबत तातडीने ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत असून, अन्यथा पर्यावरणीय व आरोग्यविषयक प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# नवऱ्याने बायकोला मान द्यायलाच पाहिजे, असं ठणकावून सांगणाऱ्या ताराबाई शिंदे कोण होत्या?

महाराष्ट्रातील नायिका या मालिकेतून महाराष्ट्राच्या जडण-घडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिलांचा परिचय करुन देण्यात येत आहे. त्यानिमित्ताने महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या ताराबाई शिंदे यांची आणि त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाची ही ओळख.

ताराबाई शिंदे यांचं लेखन इंग्रजीत भाषांतरित झालंय. स्त्री-हक्क विषयक चळवळीत त्यांचं नाव आवर्जून घेतलं जातं.

या पुस्तकावर आणि ताराबाईंवर सनातनी विचारांच्या लोकांनी टिकेची झोड उठवली. महात्मा फुलेंनी या टीकेला सडेतोड उत्तर दिलं होतं.

भारतात स्त्रीप्रश्नांना वाचा फोडण्याचं काम सुरुवातीला पुरुष समाजसुधारकांनी केलं. बालविवाह, सती प्रथा, पुनर्विवाहाला बंदी, स्त्रीशिक्षणाला विरोध अशा परंपरांचं जोखड दूर होऊ लागलं.

मोकळा श्वास घेणाऱ्या स्त्रियां बोलत्या आणि लिहित्या झाल्या. आपलं म्हणणं आपल्या भाषेत मांडू लागल्या. स्त्री-पुरुष भेदभावाला आव्हान देऊ लागल्या. अशा स्त्रियातील एक अग्रणी नाव ताराबाई शिंदे. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचाराचं बाळकडू ताराबाईंना घरातून मिळालं. फुले म्हणायचे, 'हिंदू धर्म ब्राह्मणांना वरचे आणि शुद्रातिशुद्रांना हीन मानतो, कारण तो ब्राह्मणांनी रचलेला धर्म आहे'. हाच विचारांचा धागा पुढे नेत ताराबाई म्हणतात की, 'हा धर्म स्त्रियांना कमी लेखतो, त्यांची दडपणूक करतो, कारण तो पुरुषांनी लिहिलेला आहे.'याच पुरुषजातीला प्रश्न विचारण्याचं काम त्यांनी 'स्त्री पुरुष तुलना' या आपल्या पुस्तकातून केलं. हे पुस्तक १८८२ साली प्रकाशित झालं. पण हे साल झाकून वा बदलून आज पुस्तक प्रकाशित झालं तरी चालेल, इतके हे विचार आजही समर्पक आहेत.ताराबाई इंग्रजी शिकू लागल्या...साल १८५०. भारत स्वतंत्र व्हायच्या आधी जवळपास १०० वर्षे आधीचा काळ. महाराष्ट्रातल्या बुलढाणा गावात बापूजी हरि शिंदे यांच्या घरात मुलगी जन्माला आली. चार मुलग्यांच्या पाठीवर झालेली मुलगी, ताराबाई. बापूजी शिंदे सधन जमीनदार आणि सरकारी कार्यालयात हेडक्लार्क होते.महात्मा फुलेंचे सुधारणावादी विचार त्यांना पटायचे. म्हणूनच त्यांनी ताराबाईंना मुलगी म्हणून वेगळं मानलं नाही. मुलांच्या बरोबरीनं वाढवलं. त्या काळी मुलींसाठी शाळा नव्हत्या. बापूजींनी ताराबाईंना घरी शिकवलं. मराठी, संस्कृत आणि इंग्रजी भाषेची ओळख करून दिली. वाचायला आणि नव्या गोष्टी शिकायला प्रोत्साहन दिलं.

'चूल आणि मूल' हेच बाईचं विश्व आहे, हे समजण्याचा तो काळ होता. ताराबाई मात्र त्याहीपलिकडचं विश्व समजून घेत वाढल्या. घराबाहेरचे व्यवहार सांभाळण्यातही त्या कुशल झाल्या. मग ते घोड्यावर बसून शेतातला कारभार पाहणं असो की कोर्टकचेरीची कामं असो. एरवी पुरुषांच्या मानल्या जाणाऱ्या कामातही त्यांना चांगलीच गती होती. जगावेगळं जगणाऱ्या ताराबाईंना जगाचंही भान होतं. आसपासच्या स्त्रियांचं जगणं, त्यांची कुचंबणा त्या पाहात होत्या. त्यामुळे लग्न आणि सांसारिक जबाबदाऱ्यांत अडकून पडायला त्यांचं मन राजी नव्हतं.आपल्याला लग्न करण्याची इच्छा नाही, असं त्यांनी वडिलांना सांगितलं. लाडक्या मुलीचं मन जपायचं की जनरित सांभाळायची अशा कात्रीत सापडलेल्या बापूजी शिंदेंनी मध्यममार्ग सुचवला.ताराबाईंना लग्नानंतर परक्या घरी जायला लागू नये म्हणून त्यांनी घरजावई होईल, असा वर निवडला. हेही ताराबाईंना मान्य नव्हतं, पण नाखुशीने त्यांनी हे लग्न केलं. याची खंत त्यांच्या मनात जरूर राहिली. पण स्त्री म्हणून वाट्याला आलेल्या या स्वानुभवाने त्यांच्या विचारांना आणखी धार आली.ताराबाई शिंदे हे व्यक्तिमत्व आणि त्यांचे विचार समाजासमोर आले ते त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकामुळे. हे पुस्तक त्यांनी १८८२ मध्ये म्हणजे वयाची तिशी पार केल्यावर लिहिलं. त्यांच्या जीवनकाळात प्रकाशित झालेलं त्यांचं हे एकमेव पुस्तक.ज्यात त्यांनी 'स्त्री पुरुष नात्यात पुरुषांना झुकतं माप का?' 'सर्व दोषांचं खापर स्त्रियांच्या माथी का मारलं जातं?' 'स्त्रियांच्या दुःखाला जबाबदार कोण?' अशा स्त्री-पुरुष समतेच्या मुळाशी असणाऱ्या प्रश्नांची परखडपणे चर्चा केली आहे.विधवा गरोदर महिलेच्या विरोधात खटला

१८८१ मध्ये घडलेल्या एका घटनेनं व्यथित होऊन ताराबाईंनी 'स्त्री पुरुष तुलना' लिहिलं. सुरतमधल्या विजयालक्ष्मी या ब्राह्मण विधवा महिलेशी संबंधित ही घटना होती.

ही महिला गर्भवती झाली, समाजाच्या भीतीनं तिने नवजात अर्भकाला मारून टाकलं. तिच्या विरोधात खटला चालला. मॅजिस्ट्रेट कोर्टात तिला फाशीची शिक्षा झाली. ती बदलून मुंबई हायकोर्टानं जन्मठेप ठोठावली.विजयालक्ष्मीनं शिक्षेच्या माफीची याचना केल्यानंतर पाच वर्षं सक्त कैदेची शिक्षा झाली. ही सविस्तर माहिती मे १८८१ मध्ये टाईम्स ऑफ इंडियामध्ये छापून आली. ती ताराबाईंनी वाचली. न्यायालयानं शिक्षेत माफी दिल्याच्या विरोधात 'पुणे वैभव' आणि त्यासारख्या सनातनी विचारांच्या वृत्तपत्रांनी टीकेची झोड उठवली.अनैतिक संबंध करणाऱ्या स्त्रीला माफी मिळतेच कशी, हे त्यांचं म्हणणं होतं. यावर ताराबाईंचं म्हणणं होतं की अशा संबंधांची शिक्षा एकट्या स्त्रीलाच का दिली जाते? तिला फशी पाडणाऱ्या पुरुषाची चर्चा कोणीच का करत नाही? ह्या प्रश्नाने ताराबाईंना लिहितं केलं.'विजयालक्ष्मी खटला' हे तात्कालिक कारण होतं. 'स्त्री पुरुष तुलना' लिहिताना ताराबाई घटनेपेक्षा त्यामागच्या कारणांना पुढे आणतात.




पुरुषी वर्चस्व, स्त्रियांप्रती अन्यायकारक आणि पक्षपाती दृष्टीकोन याचा परामर्श घेतात. 'पुरुषांच्या कुकर्मांची यादी'ताराबाई आपल्या लेखनाला निबंध म्हणतात. 'हा निबंध मी माझ्या देशभगिनिंचा अभिमान धरून रचिला आहे' या भगिनीभावाच्या भावनेनं त्या लिहितात. सत्यशोधक विचारांचं बाळकडू आणि स्त्रीपुरुष समतेचे संस्कार यांच्या मुशीत घडलेल्या ताराबाईंचे विचार स्पष्ट तर आहेतच, त्यांची मांडणीही तर्कशुद्ध आहे.'स्त्रियांना पुष्कळ तऱ्हेचे दोष दिलेले वाचण्यात येतात. पण जे दोष स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत अजिबात नाहीत काय? जशा बायका लबाडी करितात तसे पुरुष करीत नाहीत काय?' असे विचारून ताराबाई पुरुषांच्या कुकर्मांची यादी देत विचारतात,'चोरी, शिंदळकी, खून, दरोडे, दगाबाजी, सरकारी पैसा, लांच खाणे, खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करणे, यांतून एकही अवगुण पुरुषांत नाहीं काय?' स्त्रियांवर अडाणी आणि अविचारी म्हणून शिक्का मारणाऱ्यांना त्या विचारतात, 'तुम्ही शहाणे आहात खरे. पण इकडे कारागृहांत जाऊन पहावें तो पाय ठेवण्यास देखील जागा मिळत नाही, इतकी तेथें आपल्या देशबांधवांची दाटी असतेष्ठ.असे किती कारागृह बायकांनी भरलेत दाखवा? जेथें तुमची दोन तीन हजार मंडळी, त्यांत फार झालें तर शंभरदेखील स्त्रिया निघणार नाहींत.'विजयालक्ष्मी सारख्या कोंडीत सापडलेल्या विधवांना दोष देण्याऱ्या 'पुणे वैभव' सारख्यांना त्या सुनावतात, 'जशी लांच घेणारास एकपट व देणारास दुप्पट शिक्षा लागू केली आहे, त्याचप्रमाणे या कामांतदेखील त्यांनी सक्त कायदा करावा कीं स्त्रियांना एकपट, तर पुरुषाला दुप्पट सक्तीची शिक्षा होत जाईल, असे कां असू नयें?' त्यांचा हा युक्तिवाद योग्यच आहे.

पुनर्विवाहाला संमती असली पाहिजे, विधवांनाही घर, पतीप्रेम मिळाले पाहिजे असे त्या सांगतात.

'पतीने पत्नीला मान दिला पाहिजे'

'दुर्गुणांची उत्पत्ति आधी आपलेपासूनच झाली. प्रथम स्वधर्म सोडून मन मानेल तसें वर्तन करणे, दारू पिऊन रस्त्यात लोळणें, जुवा खेळणें, रांडा ठेवणे इत्यादि वाईट व घाणेरडीं आचारणें तुम्ही करूं लागला. आतां रांडा कोण? यांची कांही सृष्टिविरहित उत्पत्ति झाली का? रांडा या तुम्हींच फसवून घराबाहेर काढलेल्या स्त्रियांपैकी स्त्रिया असतात.'सेक्स वर्कर स्त्रियांबाबतचे ताराबाईंचे दीडशे वर्षांपूर्वीचे हे वक्तव्य आजही अनेकांच्या पचनी पडणार नाही!

स्त्रियांच्या प्रतिष्ठेचा बळी घेणारा विवाह त्यांना अमान्य होता. त्यांना वाटते 'एकनिष्ठ जर मूल्य म्हणून स्वीकारायचे असेल तर ते उभयपक्षा लावले पाहिजे'. पतीने पत्नीला मान दिला पाहिजे, प्रेम दिले पाहिजे, ही त्यांची भावना होती.मुलीला उजवायला उतावीळ झालेल्या आणि कोणाच्याही गळयात बांधायला निघालेल्या मातापित्यालाही त्या चार खडे बोल सुनावतात. विशेष म्हणजे यात त्या आपला अनुभवही गुंफतात,'कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकीचे फक्त लाडाकरितां व आवडीकरिता एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे जवळच बाळगितात. पुढें जोपर्यंत ती उभयतां अज्ञान व असमंजस असतात तोपर्यंत बरेंच चालतें.एकदा जरा चांगले समजू लागले म्हणजे ही बया श्रीमंताची, सदा ऐषआरामींत वागलेली चतुर, हुशार, नी बाबा म्हणजे जन्मकरंट्याचेष्ठ. तेव्हा तिला तो न आवडून, ते केवळ शालजोडीला रकट्याचें ठिगळ याप्रमाणे होऊन पुढें जे प्रकार होणें ते होतात.''स्त्री धर्म म्हणजे जर बायकोला नवराच देव, असे असेल तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणे नकों का' म्हणजे नवरा नामक देवाने बायकोचे सुख-दुःख जाणून घ्यायला हवे, असे त्यांना वाटते. पण हे म्हणताना त्यांची तिरकस शैली धर्म आणि देवादिकांचाही समाचार घेते.'अरे तुमचे देवदेखील दगेबाज; मग तुम्ही असालच असाल, यांत नवल काय? इंद्राने गौतमाचे रूपाने जाऊन आहिल्येसारखे साध्विला कलंक लाविला. चंद्रावळ महापतिव्रता होती, तेथे कृष्णमहाराजांनी राहीरूपानें तिचे व्रताचा भंग केला की नाही?'सनातन्यांचा विरोध, दुसऱ्या आवृत्तीला आडकाठी

'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक विवाह संस्था, पुरुषी वर्चस्व, धार्मिक चालिरिती, कर्मकांडे या सगळ्यांची मुद्देसूद चिरफाड करते. स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद हे शब्दही तेव्हा अस्तित्वात नव्हते, पण या विचारांची बीजे या पुस्तकात आहेत. स्त्री पुरुष तुलना'चे परखड विचार त्यावेळच्या समाजाच्या पचनी पडणे कठीणच होते. या पुस्तकाच्या पहिली ५०० प्रतींची आवृत्ती तर प्रकाशित झाली. पण सनातनी, प्रतिगामी लोकांनी त्याला तीव्र विरोध केला. दबाव आणला. त्या काळी लेखन, प्रकाशन हे शिक्षणाची परंपरा असलेल्या वरच्या जातींच्याच हाती होते. दुसरी आवृत्ती येऊ शकली नाही.या विरोधाला महात्मा फुले यांनी प्रत्युत्तर दिले. ऑक्टोबर १८८५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सत्सार' या त्यांच्या अनियतकालिकात त्यांनी लिहिले'स्त्री पुरुष तुलना'च्या लेखनाचे मर्म समजून न घेता लेखिकेला टीकेचे लक्ष्य करणाऱ्या पत्रकारांना त्यांनी आपल्या खास उपरोधिक शैलीत समाचार घेतला.फुले लिहितात- 'बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजे त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरूं लागल्यामुळे, कित्येक कुलीन पतिव्रता स्त्रियांस अतिशय विषम वाटून, त्या अज्ञानी व निर्बळ असल्यामुळे अमर्याद कोपातें पावून, त्यांचे मनांत दुष्कर्मरूपी समुद्राच्या अति भयंकर लाटा उद्भवतात, त्याचें निवारण व्हावे याप्रीत्यर्थ त्यांनी (ताराबाईंनी) पुरुष मंडळास बोध केलाष्ठ. परंतु तो बोध एक आडमूठ वर्तमानपत्रकर्त्यास रूचला नाही. सबब, अथवा सौ. ताराबाईचें पुस्तक खंडन करू लागल्यानें, उलट आपल्याच गळयांत त्यांतील सर्व दोषांचे घोंगडें पडेल, या भयास्तव राजश्रींनीं त्या पुस्तकांतील एकंदर सर्व बोधाचा धिःकार करून त्यास कचऱ्याचे पेटींत झोंकून आपलें नाक मुठींत धरून उलटी ताराबाईचीच निंदा करून तिचे उपकार फेडले.फुले या टिकाकारांना सल्ला देतात की त्यांनी आपल्या पत्नीला शिकवावे, विद्वान करावे, आणि तिला ताराबाईंच्या विचारांचे खंडन करू द्यावे. 'याला स्वतः चि. ताराबाईंसारखे शिस्तवार असून मार्मिक लिहितां तरी येतें काय' असा सवालही ते विचारतात. या लेखनात फुले ताराबाईना 'चिरंजिवीनी' संबोधतात.पहिल्या प्रकाशनानंतर काही काळ चर्चेत राहिलेलं हे पुस्तक नंतर मागे पडले. सरत्या वर्षात विस्मरणात गेलं. बिजिंगच्या परिषदेत ताराबाईचं नाव१९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे झाले. त्यावेळी 'स्त्री पुरुष तुलना' पुन्हा समोर आले. त्यानंतर स्त्री अभ्यासकांनीही या पुस्तकाची समीक्षा केली. आपले परखड विचार निर्भिडपणे मांडणाऱ्या ताराबाईच्या लेखनाला उजाळा मिळाला. त्यांनी पेरलेल्या क्रांतिकारी बीजांना पुन्हा खतपाणी मिळाले.१९९५ मध्ये बिजिंगमध्ये आंतरराष्ट्रीय महिला परिषद झाली त्यावेळी प्रवेशद्वाराला ताराबाई शिंदे यांचं नाव दिलं गेलं.आज या पुस्तकाचे हिंदी, इंग्रजी अनुवाद उपलब्ध आहेत. 'आधुनिक भारताचे जनक' (मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया) या इतिहास तज्ज्ञ रामचंद्र गुहा संपादित पुस्तकात ताराबाई शिंदेंच्या लेखनाचा समावेश आहे. भारतातील स्त्रीवादाची नाळ आता या पुस्तकाशी जोडलेली आहे.

# महापौरांकडून विभागांचा जाब; स्वच्छता दूतांना

## स्मार्ट वॉच देत कामगिरीवर थेट नियंत्रण



वसई :वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कारभारावर थेट लक्ष केंद्रित करत मंगळवार, १० फेब्रुवारी रोजी महापौर मा. अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मनपा मुख्यालयात आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महापौरांनी विविध विभागांच्या कामकाजाचा खडसून जाब घेतला, तर बैठकीनंतर स्वच्छता दूतांना स्मार्ट वॉचचे वितरण करून कामावर थेट नियंत्रणाची दिशा स्पष्ट केली.

स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य, पाणीपुरवठा आदी विभागांच्या कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा महापौरांनी दिला. शहर स्वच्छतेच्या नावाखाली चालणाऱ्या केवळ कागदी कामगिरीवर आता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लगाम घालण्यात येणार असल्याचे त्यांनी सूचित केले.

या बैठकीला माजी महापौर प्रवीण शेट्टी, उपमहापौर मार्शल लोपीस, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व दिपक सावंत, नगरसेवक प्रफुल्ल साने यांच्यासह विविध उपायुक्त, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांना वेळेत काम पूर्ण न झाल्यास जबाबदारी निश्चित केली जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

स्वच्छता दूतांना देण्यात आलेल्या स्मार्ट वॉचमुळे कामाचे वेळापत्रक, उपस्थिती व प्रत्यक्ष कार्यवाहीवर नजर ठेवता येणार असून, यामुळे मनपाच्या स्वच्छता यंत्रणेत शिस्त आणि पारदर्शकता येईल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला.

महापौरांच्या या आक्रमक भूमिकेमुळे मनपातील काही विभागांची धाकधूक वाढली असून, शहराच्या कारभारात बदलाचे संकेत मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# धानिव-पेल्हारमध्ये नियमांची मोडतोड सुरूच; प्रशासनाची 'मूक संमती' की राजकीय दबाव ?



वसई : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'फ' अंतर्गत धानिव-पेल्हार परिसरात अनाधिकृत बांधकामांचा सुळसुळाट होत असतानाही प्रशासनाची भूमिका अद्याप अस्पष्टच आहे. नियमबाह्य बांधकामे उभी राहत असताना कारवाई का होत नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, या संपूर्ण प्रकाराला राजकीय पाठबळ तर नाही ना? अशी चर्चाही रंगू लागली आहे.स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, संबंधित परिसरात परवानगीशिवाय बांधकामे सुरू असून, मनपा अधिकारी केवळ नोटीसपुरते मर्यादित राहत असल्याचा आरोप होत आहे. कारवाई न झाल्याने भूमाफिया व अवैध बांधकाम व्यावसायिकांचे मनोबल वाढत असल्याचे बोलले जात आहे. प्रशासनाची ही मूक संमतीच अवैध बांधकामांना खतपाणी घालत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

दरम्यान, जाबर पाडा परिसरात घडलेल्या अलीकडील घटनेनंतर अनाधिकृत बांधकामांचे दुष्परिणाम उघड झाले आहेत. अपुऱ्या पायाभूत सुविधा, अरुंद रस्ते, अग्निशमन व रुग्णवाहिकांना अडथळे, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. असे असतानाही संबंधित विभागांकडून ठोस पावले का उचलली जात नाहीत, यावर प्रश्नचिन्ह आहे.'कारवाई केवळ दुर्बलांवरच का होते?' असा थेट सवाल उपस्थित होत असून, प्रभावशाली बांधकाम व्यावसायिकांवर हात टाकण्यास प्रशासन का कचरत आहे, असा आरोप अप्रत्यक्षपणे पुढे येत आहे. कायद्याचा धाक सर्वांसाठी समान असतो की तो केवळ कागदापुरताच मर्यादित आहे, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.शहर नियोजन, पर्यावरण आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या अवैध बांधकामांवर राजकीय दबावापलीकडे जाऊन निष्पक्ष कारवाई होणार का? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. जबाबदार अधिकाऱ्यांनी केवळ आदेश पाळण्याऐवजी कायद्याप्रती जबाबदारी स्वीकारावी, अशी जोरदार अपेक्षा व्यक्त होत आहे.


## कामगारांचा विश्वास
# युवाशक्ती कामगार संघटना (रजि.)

कामगारांचे कायदेशीर हक्क, न्याय आणि सन्मान अबाधित राहावेत यासाठी कार्यरत संघटना. वेतन, सेवा अटी, कंत्राटी कामगार प्रश्न, अन्यायाविरोधात कायद्याच्या चौकटीत मार्गदर्शन व पाठपुरावा.

अध्यक्ष : रुबिना मुल्ला
कार्याध्यक्ष तुषार आर. गायकवाड
contact/9890879757/9960144348
Emailyuvashaktikamgarsanghatana@gmail.com







## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७


वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तींशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करण्यात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in